क्रमांक : ११११७/प्र.स./२०२२
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २७ मे, २०२२

## : प रि प त्र क :

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये विधिमंडळ समित्यांचे दौरे होत असतात तेव्हा संबंधित समिती कक्षामार्फत त्या त्या जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी समितीचा दौरा कार्यक्रम आगाऊ स्वरुपात पाठविला जातो आणि त्यासोबत दौऱ्यावर जाणारे विधिमंडळातील संबंधित कक्षांचे अधिकारी आणि कर्मचारी यांचा तपशीलही दिला जातो. तथापि, प्रतिवेदन कक्षातील प्रतिवेदन अधिकाऱ्यांचे काम चक्राकार पद्धतीने सुरू असल्यामुळे संबंधित दौऱ्यासाठी नियुक्त करावयाच्या अधिकाऱ्यांची नावे आगाऊ स्वरुपात पाठविली जात नाहीत. कारण ती ऐनवेळी निश्चित होतात. परिणामी दौऱ्यावर त्यांच्या राहण्याची, वाहनाची अत्यंत गैरसोय होते, असे निदर्शनास आले आहे. वस्तुत: संसदेच्या समित्यांच्या बाबतीत अशी व्यवस्था संबंधित समिती कक्षाकडून करण्यात येते.

यास्तव सर्व कक्षांना असे सूचित करण्यात येते की, जेव्हा जेव्हा आपल्या समितीचा दौरा विषयक कार्यक्रम संबंधित जिल्हा मुख्यालयी पाठविण्यात येईल त्या त्या वेळी प्रत्येक दौऱ्यामध्ये समितीच्या बैठकीस उपस्थित राहणाऱ्या "महाराष्ट्र विधानमंडळ प्रतिवेदक" यांचेकरिता उचित अशी निवास व वाहन व्यवस्था सुनिश्चित होईल, याबाबत संबंधित कक्षाचे उप सचिव / अवर सचिव खातरजमा करतील.

**(राजेन्द्र भागवत)**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,
१. सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष
२. सचिवालयातील सर्व समिती प्रमुखांचे स्वीय सहायक